# क्विक हील फाउंडेशन आणि पुणे शहर पोलिसांतर्फे 'साय-फाय करंडक २०१७'

**पुणे :** सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या आपल्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून आयटी सुरक्षा सोल्यूशन्स क्षेत्रात आघाडीवर असलेल्या क्विक हील टेक्नॉलॉजीज् कंपनीच्या क्विक हील फाउंडेशनने पुणे शहर पोलिसांच्या सहकार्याने साय-फाय करंडक २०१७ या स्पर्धा महोत्सवाची घोषणा केली. मानवी आयुष्यावर डिजिटल क्रांतीचा झालेला परिणाम दर्शवण्यासाठी सुरू केलेले ऑनलाइन व ऑफलाइन एक अंकी नाटकांचे हे आधुनिक व्यासपीठ आहे. साय-फाय करंडक २०१७ स्पर्धेच्या बोधचिन्हाचे उद्घाटन क्विक हील टेक्नॉलॉजीज्चे वरिष्ठ कार्यकारी अधिकारी कैलास काटकर, पुणे पोलिसांच्या वित्तीय गुन्हे शाखा आणि सायबर गुन्हे विभागाचे उपायुक्त मिलिंद पाटील आणि एक्स्प्रेशन लॅबचे संचालक प्रदीप वैद्य यांच्या हस्ते करण्यात आले.